क्रमांक : १००.

# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
### मंगळवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ / श्रावण २५, १९४४ (शके)

१०१. **म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख सूचना ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना कळविण्यात येते की :-**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०२२ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनासाठी द्यावयाच्या म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचना बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ पासून SMOIS या संगणकीय प्रणालीवर महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय सुरु झाल्यापासून म्हणजेच सकाळी ९.३० वाजल्यापासून सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. या संगणकीय प्रणालीवर म.वि.प. नियम १०१-अ अन्वये उपस्थित करण्यासंबंधीची विशेष उल्लेख सूचना ज्या दिवशी सभागृहात उपस्थित करावयाची असेल त्या दिवसाच्या आदल्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत SMOIS या संगणकीय प्रणालीवर देता येईल व सायंकाळी ५.०० नंतर या प्रणालीवर सूचना स्वीकारणे बंद होईल.

२. ONLINE पध्दतीने प्राप्त होणाऱ्या विशेष उल्लेखाच्या सूचनांना संगणकीय प्रणालीद्वारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल व त्याबाबत मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा निर्णय अंतिम असेल.

३. म.वि.प.नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख सूचना पूर्णत: ONLINE पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी पुन्हा त्याच विषयाची पुनरावृत्ती करणारी सूचना OFFLINE पध्दतीने दिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

४. महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१-अ अन्वये सूचनेचा विषय हा गंभीर स्वरुपाच्या व तातडीच्या सार्वजनिक महत्वाच्या कोणत्याही बाबीसंबंधातील, स्पष्ट, एकाच विभागाशी संबंधित, मुद्देसूद व थोडक्यात ठेवून सूचनाधीन विषयाचा सारांश २ ते ३ ओळींमध्ये असणे आवश्यक आहे. तसेच सूचनेचा विषय ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाचे नांव स्पष्टपणे दर्शविण्यात यावे.

...२/-

५. म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना सभागृहात घेण्यासंबंधीचा पूर्ण अधिकार मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा राहील.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक :१६ ऑगस्ट, २०२२.**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

**याची प्रत:-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

६) संगणक कक्ष (WEBSITE)

७) एम.के.सी.एल. प्रशिक्षण विभाग.

----------